# ‘आय केअर फॉर किड्स’चे ई-बुक प्रकाशित

**पुणे :** स्वच्छंद वागडण्याच्या वयात नेत्रहीनतेमुळे लहान मुलांचे आयुष्य रंगहीन होते. डोळ्यांची काळजी लहान वयातच कशी घ्यावी, त्यांच्या दृष्टिहीनतेची कारणे, याची सचित्र शास्त्रीय माहिती देणारे ‘आय केअर फॉर किड्स’ या इंग्रजी पुस्तकाचा ‘ई-बुक’ प्रकाशन सोहळा नुकताच झाला.

‘सकाळ’चे अध्यक्ष प्रतापराव पवार आणि अभिनेते शरद पोंक्षे यांच्या हस्ते पुस्तकाचे ; तसेच बुकगंगा डॉट कॉमनिर्मित ‘ई-बुक’चे प्रकाशन झाले. या वेळी बुकगंगा डॉट कॉमच्या संचालिका सुप्रिया लिमये, पुस्तकाच्या लेखिका डॉ. जाई केळकर, शिक्षणतज्ज्ञ मीना चंदावरकर, डॉ. श्रीकांत केळकर, डॉ. आदित्य केळकर आणि नृत्यांगना अरुणा केळकर आणि कॉन्टिनेन्टलच्या देवयानी अभ्यंकर उपस्थित होत्या.

या पुस्तकात डोळ्याचे कार्य कसे चालते, हे सचित्र दाखवले आहे. मुलांना अंधत्व येण्याची कारणे, त्यावरील उपाय, अंधत्व येऊ नये म्हणून घ्यायची काळजी याची शास्त्रीय

माहिती दिली आहे. या पुस्तकाच्या ई-बुक किंवा प्रिंट कॉपीसाठी बुकगंगा डॉट कॉम या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.